# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सिंधुदुर्ग **P.S.(ठाणे):** कुडाळ **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0102 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 01/06/2022 12:22 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 (सुधारित 2018) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A (सुधारित 2018) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):**

**Date From** (दिनांक पासून): 12/05/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 12/05/2022
**Time From** (वेळेपासून): 13:25 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 16:04 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 01/06/2022 **Time** (वेळ): 12:22 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 017 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 01/06/2022 12:22 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 20 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तलाठी कार्यालय, तुळसुली तर्फ माणगाव,ता कुडाळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दत्ताराम वसंत परब

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1963 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | केरवडे तर्फ माणगाव,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | केरवडे तर्फ माणगाव,कुडाळ,कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9422002513

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाळासो शामराव शिंदे | | | 1. तलाठी सजा,तुळसुली तर्फ माणगाव, कुडाळ,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी दत्ताराम वसंत परब, वय वर्षे. 59, व्यवसाय- सेवानिवृत्त, कृषी अधिकारी, राहणार केरवडे तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, मोबा. क्र. 9422002513 समक्ष लिहुन देतो की,मी गाव मौजे केरवडे येथील रहिवासी असुन, नोकरीनिमीत्त जय संभव एल के प्लनेट, सेक्टर क्र. 6, लास्ट बस स्टॉपजवळ, करंजाडे, पनवेल, जि.रायगड येथे कुटुंबासह राहतो. मी केरवडे येथील श्रीमती विणा विलास परब यांचेकडुन केरवडे तर्फ माणगाव, ता. कुडाळ, येथील सर्व्हे क्रमांक 66अ हि.नं.50 क्षेत्र 5 गुंठे ही जमिन दिनांक 07/01/2022 रोजी खरेदी खताने खरेदी केली. खरेदीखताप्रमाणे 7/12 च्या अभिलेखात माझे नावाची नोंद होणेकरीता खरेदी खताची प्रत तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव येथे त्याच दिवशी म्हणजेच दिनांक 07/01/2022 रोजी दिली. त्यांनतर काही दिवसांनी मला माझे पनवेल येथील पत्त्यावर तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव यांची नमुना 9 ची नोटीस प्राप्त झाली. माझा मित्र दाजी हा तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव येथे कोतवाल असल्याने मी त्याला 7/12 तयार झाला काय बघ असे सांगीतले. तेव्हा त्याने अद्याप 7/12 तयार झाला नसल्याचे सांगीतले. मला शासकिय कामासाठी 7/12 ची आवश्यकता असल्याने, मी दिनांक 11/05/2022 रोजी माझे गावी केरवडे येथे आलो व दिनांक 12/05/2022 रोजी तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव येथे जावुन तलाठी श्री. शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी मी माझे 7/12 संदर्भात विचारपूस केली असता, त्यांनी 7/12 तयार झाला नसल्याचे सांगुन माझेकडे 1000/- रुपयांची मागणी केली. लोकसेवक शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांना मला लाच द्यावयाची इच्छा नसल्याने मी दि. 12/05/2022 रोजी 11.30 वा चे सुमारास अँन्टी करप्शन कार्यालय, कुडाळ येथे जावुन लोकसेवक शिंदे यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि/श्रीम. मुल्ला यांचे सांगणेवरून मी लोकसेवक शिंदे यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.माझे तक्रारीच्या अनुशंगाने श्रीम. मुल्ला, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांनी दिनांक 12/05/2022 रोजी 1) श्री. संतोष गोविंद माडये, मुख्य लिपीक, महावितरण मंडळ कार्यालय कुडाळ, व 2) श्री. संकेत लक्ष्मण सावंत, उच्चस्तर लिपीक, महावितरण मंडळ कार्यालय कुडाळ या दोन शासकीय पंचाना पाचारण केले. वरीलप्रमाणे शासकीय पंच सुमारे 12.30 वा. चे दरम्याने अँन्टी करप्शन कुडाळ कार्यालयात आल्यानंतर त्यांनी पोनि/श्रीम. मुल्ला यांची भेट घेवुन त्यांची वरीलप्रमाणे ओळख सांगितली. त्यावेळी पो.नि श्रीमती मुल्ला यांनी माझी तसेच कार्यालयीन कर्मचारी पोकाँ/पोतनीस व पोहवा/परब यांची ओळख करून दिली. पोनि/श्रीम.मुल्ला यांनी माझे तक्रारीबाबत दोन्ही पंच व पडताळणी पथकास थोडक्यात हकीगत सांगणेस सांगितली, त्यावेळी मी सर्वांना वरीलप्रमाणे लोकसेवक शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांचेविरूध्द लाचेच्या मागणीची तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि/श्रीम. मुल्ला यांनी मी स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार पंचाना वाचण्यास दिली, सदरची तक्रार वाचल्यानंतर पंच व पोनि/श्रीम. मुल्ला यांनी त्यावर स्वाक्षरी करून पोनि/मुल्ला यांनी तक्रार आपल्या ताब्यात घेतली.पो.नि.श्रीमती मुल्ला यांनी माझे तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 12/05/2022 रोजी लोकसेवक शिंदे, तलाठी तुळसुली तर्फ माणगाव यांची लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन सदरची पडताळणी

माझेकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन देवुन, माझे सोबत पंच क्र.1श्री. माडये यांना पाठवुन लोकसेवक तलाठी शिंदे व माझेत होणा-या चर्चेचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/श्रीम. मुल्ला यांनी मला तसेच पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने आवशयक त्या सुचना दिल्या. पोकाँ/पोतनीस यांनी आंम्हास मेमरी कार्ड आणि व्हाँईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक दाखवले व मला आतुन कप्पा असलेली बनियन परिधान करणेसाठी दिली. त्याप्रमाणे मी सदरची बनियान परिधान करुन त्यावर शर्ट घातले. पोनि/श्रीम.मुल्ला यांचे सुचनेवरून पोकाँ/पोतनीस यांनी पडताळणी कारवाईचे अनुशंगाने पोनि/श्रीम.मुल्ला, माझे तसेच दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले व व्हाईस रेकॉर्डर चालु करून मी परिधान केलेल्या बनियनच्या आतील कप्प्यात लपवुन ठेवुन दिला. त्यानंतर सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून श्री. शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांची भेट घेण्याकरीता मी व पंच नं. 1 श्री. माडये असे आपआपल्या दुचाकी वाहनाने तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव येथे गेलो. तलाठी कार्यालय जिन्यावर असल्याने मी लोकसेवक शिंदे यांना संशय येवु नये याकरीता पंच श्री. माडये यांना खालीच थांबण्यास सांगितले व मी जिने चढुन तलाठी कार्यालयात जावुन तलाठी शिंदे यांची भेट घेतली. तलाठी शिंदे यांचेकडे नोटीसची प्रत देवुन विणा विलास परब हीची स्वाक्षरी घेतली असल्याचे सांगुन, 7/12 बाबत विचारणा केली असता त्यांनी मला थोडावेळ थांबा असे सांगितले. काही वेळाने कार्यालयातील गर्दी कमी झाल्यानंतर मी पुन्हा तलाठी शिंदे यांची भेट घेतली. त्यावेळी तलाठी शिंदे यांनी मला तुमचे जमिनीचे क्षेत्र लहान असल्याने तुकडेबंदी कायद्याचा भंग होत आहे, त्यामुळे 15,000/- रू. ची पावती फाडावी लागणार, पावती फाडणार की भावुसाहेबांची इच्छा असेल तसं करणार  असे विचारले. त्यावेळी मी त्यांना मला 7/12 मिळणं महत्वाचं आहे, काय करू असे विचारले असता त्यांनी भावुसाहेबांना चार पाच हजार रूपये द्या असे सांगुन माझेकडे स्वतःकरीता 1000/- रू. व मंडळ अधिकारी पास्ते यांचेकरीता 5000/- रू. असे एकुण 6000/- रू. ची लाचेची मागणी केली. तलाठी शिंदे यांना मी मला एवढे पैसे द्यायला जमणार नाहीत, तुम्हाला 1000/- व सर्कल ना 2000/- असे मिळुन एकुण 3000/- रू. मला द्यायला जमतील असे सांगितले. त्यावेळी तलाठी शिंदे यांनी मंडळ अधिकारी पास्ते भाऊसाहेबाना भेटुन तूमचा विषय सांगा, ते मार्गदर्शन करतील असे सांगीतले. त्यानंतर तलाठी शिंदे यांचे सोबत मी मंडळ अधिकारी कार्यालय कुडाळ येथे गेलो. तेथे मंडळ अधिकरी श्री.पास्ते यांची भेट घेतली. तलाठी शिंदे यांनी मंडळ अधिकारी पास्ते यांना माझे 7/12 सबंधीचा विषय सांगीतला, तेव्हा श्री. पास्ते यांनी तुकडा बंदी कायदा आहे ना असे सांगुन खरेदी खताच्या रक्कमेच्या 25 ते 50 टक्के रक्कमेची म्हणजेच 15,000/- रुपयांची पावती करावी लागेल असे सांगीतले. मंडळ अधिकारी पास्ते यांना मी अजुन काही मार्ग आहे का असे विचारले असता त्यांनी मी आता रिपोर्ट लिहीत आहे, माझी लिंक तुटते आपण नंतर बोलु असे सांगीतले. परंतु मंडळ अधिकारी श्री. पास्ते यांनी माझेकडे कोणत्याही प्रकारची लाचेची मागणी केली नाही.त्यानंतर मी व तलाठी शिंदे असे मंडळ अधिकारी कुडाळ कार्यालयाबाहेर आलो व आपआपल्या मोटार सायकलने तहसीलदार कार्यालय कुडाळ येथे जाणेस निघालो. वाटेत तलाठी शिंदे यांनी मला तूम्ही जे बोललात ते करा असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना सर्कल यांचे 2000/- रुपये आणि तूमचे 1000/- रुपये असे टोटल 3000/- असे म्हटले असता तलाठी शिंदे यांनी हो..तुमच्या मनाला वाटेल तस असे म्हणुन मला वाटेत असलेले युनियन बंकचे ATM दाखविले, त्यावेळी मी त्यांना माझं ATM दुस-या बंकेचे असल्याचे सांगुन अँग्रीकल्चर ऑफिसमध्ये मित्र आहे त्यांचेकडुन पैशांची व्यवस्था करतो असे सांगितले. तलाठी शिंदे यांनी मला पैशाची व्यवस्था झाली की फोन करा असे सांगितले व ते तहसीलदार कार्यालयात जाणेस निघुन गेले. पोलीस निरीक्षक श्रीम. मुल्ला यांनी मला घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता मी त्यांना वरीलप्रमाणे घडलेली हकीगत सांगितली. त्या अनुशंगाने पोनि/श्रीम.मुल्ला यांनी डिजीटल व्हाँईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेले माझे, तलाठी शिंदे व मंडळ अधिकारी पास्ते यांचेत झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, मी केरवडे तर्फ माणगाव येथील सर्व्हे क्रमांक 66अ हि.नं.50 क्षेत्र 5 गुंठे हया कायदेशीर रित्या खरेदी केलेल्या जमिनीची 7/12 च्या अधिकार अभिलेखात नोंद करणे करीता लोकसेवक शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांनी माझेकडे स्वतःकरीता 1000/- रू. व मंडळ अधिकारी पास्ते यांचेकरीता 5000/- अशी एकुण 6000/- रूपयांची मागणी करून, तडजोडीअंती 3000/- रू. स्विकारण्याचे कबुल करून सदरची रक्कम घेवुन येण्यापुर्वी फोन करा असे सांगितले असल्याचे डिजीटल व्हाँईस रेकॉर्डरद्वारे ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणा वरून आढळुन आल्याने लोकसेवक शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचे पोनि/श्रीम .मुल्ला यांनी निश्चित केले. दिनांक 12/05/2022 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक शिंदे, तलाठी यांनी पैशाची व्यवस्था झाल्यानंतर फोन करा असे सांगितले असल्याने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून दिनांक 12/05/2022 रोजी सायंकाळी 18.46 वाजता माझे मोबाईल क्रमांक 9422002513 वरुन लोकसेवक शिंदे यांचे मोबाईल क्रमांक 9881289003 वर कॉल केला परंतु लोकसेवक शिंदे यांचा मोबाईल स्विच ऑफ असल्याचे आढळुन आले. त्यामुळे दिनांक 12/05/2022 रोजी लोकसेवक शिंदे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविता आलेला नाही. दिनांक 13/05/2022 रोजी लोकसेवक शिंदे यांचेविरूध्द तलाठी कार्यालय तुळसुली येथे लाचेचा सापळा आजमाविण्याचे पोनि/श्रीम.मुल्ला यांनी निश्चित करून तशा पंच व पोलीस कर्मचारी यांना सुचना दिल्या व मला दि. 13/05/2022 रोजी सकाळी 11.00 वाजता माणगाव तिठा येथे थांबण्यास सांगितले.दिनांक 13/05/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती मुल्ला यांचे सुचनेप्रमाणे मी माणगाव तिठा येथे थांबलो असता पोनि/श्रीम.मुल्ला हया दोन शासकीय पंच व सापळा पथकातील कर्मचारी पोहवा/परब, पोकाँ/पोतनीस व पोना/पालकर यांचेसोबत माणगाव तिठा येथे आल्या. सदर ठिकाणी लोकांची वर्दळ असल्याने पोनि/श्रीम. मुल्ला यांनी सापळा पथकास थांबण्याकरीता सोयीस्कर ठिकाणाबाबत विचारणा केली असता, मी सापळा पथकास घेवुन माणगाव थर्मल फक्टरी समोरील मोकळया जागेत गेलो. पोनि/श्रीम. मुल्ला यांनी सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करून लोकसेवक शिंदे, तलाठी यांचेविरूध्द तलाठी कार्यालय तुळुसली तर्फ माणगांव येथे लाचेचा सापळा आजमाविण्याचे निश्चित केले. पोनि/श्रीम. मुल्ला यांचे सुचनेवरून पोकाँ/पोतनीस यांनी सापळा कारवाईच्या अनुशंगाने वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून व्हाँईस रेकॉर्डर चालु करून माझे पन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवला व तलाठी शिंदे यांना देणेकरीता मी हजर केलेली लाच रक्कम रू. 3000/- माझे शर्टच्या खिशात ठेवली. त्यानंतर मी लाच रक्कम रू. 3000/- घेवुन तलाठी शिंदे यांना देणेकरीता तलाठी कार्यालय तुळसुली येथे गेलो त्यावेळी तलाठी शिंदे हे कार्यालयात हजर नसल्याचे समजले. त्यानंतर मी सापळा पथकाजवळ येवुन सापळा पथकास सदरची हकीगत सांगितली. तलाठी शिंदे कार्यालयात येणार अगर कसे याबाबत खात्री करणेकरीता पोनि/श्रीमती मुल्ला यांचे सुचनेवरुन मी लोकसेवक शिंदे यांचे मोबाईल क्रमांक 9881289003 वर कॉल केला परंतु लोकसेवक शिंदे यांचा मोबाईल स्विच ऑफ असल्याचे आढळुन आले. त्यानंतर आंम्ही वरीलप्रमाणे सापळा पथक तेथुन निघुन ए.सी.बी. कार्यालय कुडाळ येथे आलो. पोनि/श्रीमती मुल्ला यांचे सुचनेवरून आंम्ही वरीलप्रमाणे सापळा पथक लोकसेवक शिंदे यांच्या फोनची वाट पाहत ला.प्र.वि. कार्यालयात थांबुन राहीलो. परंतु लोकसेवक शिंदे यांनी कॉलबक न केल्याने पोनि/श्रीम. मुल्ला यांनी दिनांक 13/05/2022 रोजीची सापळा कारवाई तुर्त स्थगित करण्याचा निर्णय घेतला. दिनांक 14/05/2022 ते दिनांक 16/05/2022 शासकीय सुट्टी असल्याने पोनि/श्रीम. मुल्ला यांनी दिनांक 17/05/2022 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याचे निश्चित करून त्याबाबत पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. तसेच दरम्यानच्या काळात मला तलाठी शिंदे यांचा फोन आल्यास त्याबाबत अलर्ट राहणेबाबत सापळा पथक व पंचांना सांगितले. त्यानंतर मी ए.सी.बी कार्यालयातुन   निघुन माझे केरवडे येथील घरी गेलो.दिनांक 14/05/2022 रोजी माझे मित्र शिवराम केशव वारंग उर्फ दाजी, माजी कोतवाल, तलाठी कार्यालय तुळसुली तर्फ माणगाव हे सायंकाळी 07.00 वाजण्याच्या सुमारास माझे केरवडे येथील घरी आले. त्यांनी मला माझे सातबाराच्या कामसंबधी विचारणा केली मी त्यांना अद्याप

सातबारा मिळाला नसल्याचे सांगितले. त्यावेळी दाजी यांनी मला तु अँन्टी करप्शन विभागाकडे त्यांची तक्रार केली असल्याचे त्यांना समजले आहे ते खरे आहे का ? याबाबत विचारणा केली असता मी त्यांना कोठेही तक्रार केली नसल्याचे सांगितले. त्यावेळी दाजी यांनी "तलाठी शिंदे भाऊ साहेबांनी तुला अँन्टी करप्शनच्या कार्यालयाकडे जाताना बघीतले आहे, त्यामुळे ते घाबरले आहेत, तसे असल्यास तु काही तक्रार करू नकोस, ते लवकरात लवकर तुझा सातबारा तयार करून देतील असे सांगितले.

तलाठी शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव यांनी दिनांक 12/05/2022 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान मला पैशाची व्यवस्था झाल्यानंतर फोन करा असे सांगितले, परंतु त्यानंतर त्यांचा फोन स्विच ऑफ असल्याने मला त्यांचेशी संपर्क साधता आलेला नाही. दरम्यानच्या काळात तलाठी शिंदे यांनी माझेशी प्रत्यक्ष अथवा फोनवरून संपर्क साधलेला नाही. यावरुन तलाठी श्री. शिंदे यांना संशय आल्याने ते आता काही माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत, अशी माझी खात्री झाल्याने तलाठी शिंदे यांनी केलेल्या 3,000/- रुपयांच्या लाचेच्या मागणीबाबत आपल्या विभागाकडुन पुढील योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. याबाबत मी पोनि/मुल्ला, ए.सी.बी. सिंधुदुर्ग यांचेकडे दोन पंचासमक्ष जबाब नोंदविलेला आहे.अशा रितीने मी गाव मौजे केरवडे तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्रमांक 66अ हि.नं. 50 क्षेत्र 5 गुंठे या कायदेशीर रित्या खरेदी केलेल्या जमिनीची सातबाराचे अधिकार अभिलेखात नोंद करून सातबारा देणेकरीता लोकसेवक बाळासो शामराव शिंदे, तलाठी सजा तुळसुली तर्फ माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, यांनी दिनांक 12/05/2022 रोजी 13.25 ते 16.04 वा. चे मुदतीत स्वतःकरीता 1000/- व मंडळ अधिकारी पास्ते यांचेकरीता 2000/- अशी एकुण 3000/- रूपये लाचेची मागणी केल्याने माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** fulchand bhagwanrao mengde(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार
कुडाळ पोलीस ठाणे
जि.सिंधुदुर्ग

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** fulchand bhagwanrao mengd
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI